23 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी

विविध वंचित समूहांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा : शिवाजी विद्यापीठातर्फे परिषदेचे आयोजन

पहिली सामाजिक समावेशन गोलमेज परिषद

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'पहिली सामाजिक समावेशन गोलमेज परिषद' शिवाजी विद्यापीठात गुरूवारी पार पडली. 'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि व्यवहार' हा या विषयावर परिषदेत चर्चा झाली.

सामाजिक वंचिततेची ऐतिहासिक कारणे, तिचे बदलते स्वरूप, भारतीय समतावादी विचारपरंपरा आणि सामाजिक समावेशनाच्या धोरणात्मक व व्यावहारिक पैलूंवर या परिषदेत विचारमंथन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते झाले. सामजिक समावेशनाचे सिद्धांत आणि धोरण हे वंचितता नष्ट करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून आता ती प्रत्यक्ष व्यवहारात उतरविणे आवश्यक बनले असल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले. यावेळी सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : परिषदेत सहभागी कुलगुरू डॉ. राजनीश कामत सोबत ज्येष्ठ विचारवंत, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते.

भारतीय समाजातील जातीय विषमता, स्त्री–पुरुष असमानता, शैक्षणिक व आर्थिक विषमता व विविध वंचित समूहांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा झाली. परिषदेच्या पहिल्या सत्रात 'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि ऐतिहासिक संदर्भ' या विषयावर चर्चा झाली. प्राचार्य डॉ. हरीश भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर, शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे आणि डॉ. शरद गायकवाड यांनी आपली मांडणी केली. परिषदेच्या समारोपप्रसंगी सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एम. के. भानारकर यांनी सामूहिक निष्कर्ष व शिफारसींची मांडणी केली. अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एम. के. भानारकर यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. या परिषदेत डॉ. गिरीश मोरे, प्रा. डॉ. कैलास अंबुलगेकर, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. विनोद पवार, डॉ. पवनकुमार गायकवाड, डॉ. चंद्रकांत कुरणे, प्रा. डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. शरद बनसोडे, डॉ. विवेक थुपदाळे, डॉ. डॉ. भरत नाईक, विद्यानंद खंडागळे, प्रा. डॉ. चेतना सोनकांबळे , प्रा. डॉ. निशा पवार, डॉ. शिवाजी जाधव, प्रा. डॉ. तृप्ती करीकट्टी. डॉ. माधव भिलावे, डॉ. किरण पवार, डॉ. श्रीपाल गायकवाड, डॉ. उदय पाटील आदी सहभागी झाले होते.

मान्यवरांचे विचारंथन...

दुसऱ्या सत्रात 'फुले विचार आणि भारतीय समतावादी विचारपरंपरा' या विषयावर चर्चा झाली. या सत्रात डॉ. दशरथ पारेकर, प्रा. डॉ. भारती पाटील आणि डॉ. अरुण शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात 'धोरणे, व्यवहार आणि सामाजिक समावेशनाचे भवितव्य' या विषयावर विचारमंथन झाले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार, सामाजिक कार्यकर्ते कॉ. संपत देसाई आणि सामाजिक विचारवंत हमायु मुरसल यांनी विविध मुद्यांवर आपली मते मांडली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप

23 OCT 2026 तरुण भारत

शिवाजी विद्यापीठात अविष्कार स्पर्धा उत्साहात : एकूण ३९३ स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

पर्यावरण विभागाला जनरल चॅम्पियनशीप

त. भा. प्रतिनिधी



कोल्हापूर : स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक देवून गौरव करण्यात आला.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित अविष्कार स्पर्धेत पर्यावरण विभागाने जनरल चॅम्पियनशीप मिळवली. जैवतंत्रज्ञान विभाग, जैवरसायन विभाग, पर्यावरण शास्त्र विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आणि कृषी रसायने आणि कीड व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

युजी आणि पीपीजी स्तरावर एकूण सहा डिसिप्लिन अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ह्युमेनिटीज लैंग्वेज आणि फाईन आर्ट्स, आर्ट्स कॉमर्स मॅ नेजमेंट आणि लॉ, प्युअर सायन्स, एग्रीकल्चर आणि ॲनिमल हसबंडरी, इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी, मेडिसिन आणि फार्मसी यामध्ये युजी स्तरावर स्पर्धा झाली. तीन जिल्ह्यामधून प्रत्येकी ३० तर पीपीजी विभागातून एकूण ७५ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेत एकूण ३९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जनरल चॅम्पियनशिप पर्यावरणशास्त्र विभागाने जिंकली.

स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, आणि प्र-कुलगुरू डॉ. जे. पी. जाधव यांच्या हस्ते झाले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला. डॉ आसावरी जाधव यांनी आभार मानले. डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. पी. के. पवार, डॉ. ए. एस. जाधव सुरेखा अडके यांनी नियोजन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. एस. जी. घाणे, विद्यापीठाचे अविष्कार संचालक डॉ. पी. के. पवार, स्पर्धेचे संयोजक डॉ. एन. बी. गायकवाड आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल व विजेत्या महाविद्यालयांची नावे खालीलप्रमाणे

जनरल चॅम्पियनशीप : पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ डिसिप्लिन वाईज : १) ह्युमेनिटीज लैंग्वेज आणि फाईन आर्ट्स : किसनवीर महाविद्यालय, वाई, सातारा. २) आर्ट्स कॉमर्स मॅ नेजमेंट आणि लॉ : पर्यावरण शास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, ३) प्युअर सायन्स: स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, ४) एग्रीकल्चर आणि ॲनिमल हसबंडरी : आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली, ५) इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी: जिओग्राफी विभाग, शिवाजी विद्यापीठ, ६ मेडिसिन आणि फार्मसी : स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2026

लोकमत

तृतीयपंथीयांना रोजगाराची संधी, शिवाजी विद्यापीठाचे पाऊल!

सुरक्षा विभागात दोघांना काम देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तृतीयपंथीय व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून सन्मानाने जगण्याची आणि स्वावलंबी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यापीठाच्या सुरक्षा विभागात दोन तृतीयपंथीय व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची विनंती विद्यापीठाने मान्य केली आहे. राज्यातील विद्यापीठ स्तरावर अशा प्रकारे थेट रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा हा पहिलाच निर्णय आहे.

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी ६ ऑगस्ट २०२६ रोजी कुलगुरूंना यासंदर्भात निवेदन दिले होते. तृतीयपंथीय व्यक्तींना समाजात सन्मानाने जगता यावे आणि त्यांना उपजीविकेचे साधन मिळावे, यासाठी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागात नियुक्ती करण्याची मागणी त्यांनी केली होती. यासंदर्भातील ठराव परिषदेत मंजूर आहे. विद्यापीठाने यापूर्वीच प्रवेश प्रक्रियेत तृतीयपंथीय प्रवर्गाचा समावेश केला आहे. योग्य प्रशासकीय पडताळणी आणि आवश्यक अटींच्या अधीन राहून या नियुक्त्या करण्याची विनंती केली आहे. सध्या विद्यापीठाच्या सुरक्षा विभागात माजी सैनिक, पॅरा मिलिटरी फोर्स, गृहरक्षक दल आणि एसआरपीमधील पात्र उमेदवारांची सुरक्षा रक्षक पदासाठी ११ महिन्यांच्या कालावधीकरिता नियुक्ती केली जाते. या व्यवस्थेत तृतीयपंथीय व्यक्तींनाही संधी मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 OCT 2026

सकाळ

विद्यापीठांनी नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करावे

जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह : पर्यावरण लोक चळवळ उभारण्याचे आवाहन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे हा विवेक आहे, तर पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणे ही विकृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करण्यासह शेतकरी, नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष व्याख्यानात गुरुवारी बोलताना जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह. यावेळी शेजारी डॉ. प्रकाश पवार, व्ही. एन. शिंदे, माणिकराव साळुंखे, प्रल्हाद माने उपस्थित होते.

पंचगंगा नदीबाबत शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन हवे

■ **डॉ. सिंह म्हणाले, नद्यांना प्रदूषणापासून वाचवणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज आहे. नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट-काँक्रिटच्या भिंती उभारून आपण नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत.**

'अल निनो'च्या संभाव्य संकटाविषयी सावध करताना डॉ. सिंह म्हणाले, 'या हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्थलांतरात वाढ होण्यासह अन्नधान्य उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकचेतना जागृत करून जलस्रोतांचे संरक्षण आणि नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.'

डॉ. साळुंखे म्हणाले, 'बदलत्या हवामानाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. या बदलांचा फटका कोल्हापूरसारख्या सधन प्रदेशालाही बसण्याची शक्यता असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी आतापासूनच कृतिशील प्रयत्न करणे आवश्यक आहे.'

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर, दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 OCT 2026

जनप्रवास

जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन काळाची गरज

जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

जनप्रवास : कोल्हापूर

शाश्वत विकासासाठी जलसंवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे हा विवेक आहे, तर पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणे ही विकृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करण्याबरोबरच शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि 'जलपुरुष' डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' हा व्याख्यानाचा विषय होता. माजी कुलगुरू प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र सिंह. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. प्रल्हाद माने.

डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिसरात जलसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याबरोबरच उपलब्ध संसाधनांचा विवेकी वापर करण्याचे उदाहरण विद्यापीठाने निर्माण केले आहे. मात्र, शाश्वत विकासाची प्रक्रिया एका दिवसात पूर्ण होत नाही. त्यासाठी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागतात. शेतकरी आणि नागरिकांना जलसाक्षर करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. डॉ. साळुंखे म्हणाले, बदलत्या हवामानाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. या बदलांचा फटका कोल्हापूरसारख्या सधन प्रदेशालाही बसण्याची शक्यता असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी आतापासूनच कृतीशील प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर आणि डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र व गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

नद्यांना प्रदूषणापासून वाचवा; काँक्रिटीकरण टाळा

नद्यांना प्रदूषणापासून वाचवणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट-काँक्रीटच्या भिंती उभारून आपण नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत, असे त्यांनी नमूद केले. पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. वेळीच नियोजन केले नाही, तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते. स्थलांतरात वाढ होण्याबरोबरच अन्नधान्य उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

23 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जलसाक्षरतेसाठी विद्यापीठांनी पुढे यावे

जलतज्ञ डॉ. राजेंद्रसिंह : शिवाजी विद्यापीठात जलसंवर्धन आणि अहिंसक विकासावर व्याख्यान

त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

निसर्ग संवर्धनासह शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्मितीसाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि 'जलपुरुष' डॉ. राजेंद्रसिंह यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील विवेक जागृत करण्याची गरज अधोरेखित केली पाहिजे.हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. वेळीच नियोजन केले नाही, तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते.



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना डॉ. राजेंद्र सिंह समोर उपस्थित प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी.

लोकचळवळ उभारण्याचे केले आवाहन

यावेळी प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर आणि डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले.

प्रदूषणापासून नद्यांना वाचवा

नद्यांचे प्रदूषण थांबवून त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट–काँक्रीटच्या भिंती उभारून नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत, पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज डॉ. राजेंद्रसिंह यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 OCT 2026 पुढारी

जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन काळाची गरज : डॉ. राजेंद्र सिंह

- शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह. समवेत माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शाश्वत विकासासाठी जलसंवर्धन, जंगलांचे संरक्षण व पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन करणे आवश्यक आहे. शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करून पर्यावरण संवर्धनासाठी लोकचळवळ उभारावी, असे आवाहन जलतज्ज्ञ तथा जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे होते.

डॉ. सिंह म्हणाले, विद्यापीठाने जलसंवर्धन व पाणी व्यवस्थापनात उल्लेखनीय कार्य केले आहे. नद्यांचे नैसर्गिक स्वरूप जपून प्रदूषण रोखणे, नदी पुनरुज्जीवन करणे व काँक्रिटीकरण टाळणे गरजेचे आहे. पंचगंगा नदीच्या संवर्धनासाठी शास्त्रीय पद्धतीने उपाययोजना कराव्यात. हवामान बदल आणि अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून पाणी व अन्नधान्य नियोजन करणे आवश्यक आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. साळुंखे यांनी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत असतानाच पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी लोकांमध्ये मिसळून काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, बदलत्या हवामानाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. पर्यावरण संवर्धनासाठी आतापासूनच कृतिशील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर व डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2026
तरुण भारत

ध्येयदृष्टी, प्रत्यक्ष कार्यानेच देशसेवा : डॉ. अवनिश पाटील

प्रतिनिधी, कोल्हापूर

कोणत्याही उच्च शिक्षणापेक्षा ध्येयदृष्टी अधिक महत्त्वाची असते. निश्चित ध्येयाखेरीज मानवाच्या हातून कोणतीही महनीय कामगिरी घडणे शक्य नाही. प्रत्यक्ष कार्य करणे हीच खरी ईश्वर–उपासना आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ व राजाराम महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात 'प्राचार्य डॉ. बाळकृष्ण व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प त्यांनी गुंफले. राजाराम महाविद्यालयातील राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात हे व्याख्यान झाले. 'डॉ. बाळकृष्ण: कार्य व कर्तृत्व" त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती पाटील उपस्थित होत्या.

डॉ. पाटील म्हणाले, "डॉ. बाळकृष्ण यांनी 'द वैदिक मॅगझिन'मध्ये प्रसिद्ध केलेल्या प्रदीर्घ निबंधात भारतातील पहिली कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची तात्त्विक समीक्षा मांडली. भारतातील दारिद्र्यरेषेची पहिली सांख्यिकी मांडणी करणारे आणि कोल्हापूरचा पहिला आर्थिक–वाणिज्यिक सर्व्हे करणारे डॉ. बाळकृष्ण हे द्रष्टे अर्थतज्ज्ञ व इतिहासकार होते. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी महाविद्यालयाच्या ऐतिहासिक योगदानाचा आढावा घेतला. प्राचार्या डॉ. क्रांती पाटील यांनी डॉ. बाळकृष्ण यांच्या शैक्षणिक आदर्शांचे जतन करण्याचे आवाहन केले. राजाराम महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. ऋषिकेश दळवी यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती वर्षा पांढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बनकर यांनी आभार मानले. प्रा. सोमनाथ सातपुते यांनी आयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2026

जनप्रवास



काव्यवाचन व निबंध लेखन स्पर्धेत शितल चौगले प्रथम

जनप्रवास : कुरुकली

हिंदी सप्ताहाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या काव्यवाचन व निबंध लेखन स्पर्धेमध्ये शितल दीपक चौगले हिने दोन्ही स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत त्तब्बल दहा महाविद्यालयांतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या चुरशीच्या स्पर्धेत शितल दीपक चौगले हिने काव्यवाचन आणि निबंध लेखन या दोन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

विशेष म्हणजे, काव्यवाचन स्पर्धेत शितलने आपल्या सासऱ्यांविषयीच्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. तिच्या हृदयस्पर्शी काव्यवाचनाने संपूर्ण सभागृह भावूक झाले. उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि संपूर्ण हॉल भावनांनी भारावून गेला.

शब्दांतून भावना व्यक्त करण्याची ताकद काय असते, याचा प्रत्यय शितलच्या काव्यवाचनातून आला. तिच्या सादरीकरणाने केवळ स्पर्धा जिंकली नाही, तर उपस्थितांच्या मनालाही स्पर्श केला.

एकाच वेळी दोन स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवणे ही खरोखरच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद कामगिरी आहे. तिच्या या यशाने कुटुंबीय, मित्रपरिवार आणि हितचिंतकांची मान अभिमानाने उंचावली आहे. तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2026

पुढारी

'वाचन संस्कृती जपण्यासाठी प्रयत्न करा'

कोल्हापूर : तरुण पिढीने वाचनाच्या माध्यमातून जीवन समृद्ध करावे. तसेच, वाचन संस्कृती जपण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे 'वाचन कट्टा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. केंद्राजवळील बागेमध्ये झालेल्या उपक्रमाचे उद्घाटन ग्रंथपुष्पार्पणाद्वारे करण्यात आले. प्रभारी संचालक डॉ.धनंजय सुतार यांनी प्रास्ताविकात उपक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट केली. याप्रसंगी आरती चव्हाण, शर्मिला सावंत, सौरभ मालणकर आणि मोहिनी सुर्वे यांनी विविध पुस्तकांतील निवडक मजकुराचे उत्स्फूर्त वाचन केले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. कामत यांनी वाचनाचे महत्त्व विशद केले. सहभागी वाचकांशी संवाद साधला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी संशोधन आणि विकासासाठी ज्ञानवृद्धीच्या दृष्टीने वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. मोहिनी सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 OCT 2026

पुढारी

शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज सलग १८ वर्षे अव्वल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती ४६ व्या युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने जनरल चॅम्पियनशिप पटकावत सलग १८ व्या वर्षी अव्वल स्थान मिळविले. फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात झालेल्या महोत्सवात विवेकानंदच्या विद्यार्थी कलाकारांनी विविध कलाप्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली. लोककला, एकपात्री अभिनय, प्रहसन, शास्त्रीय सुगम गायन, तबलावादन, पाश्चिमात्य एकल गायन, एकांकिका, भारतीय समूहगीत, शास्त्रीय सुरवाद्य व तालवाद्य या स्पर्धांमध्ये महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला. याशिवाय, इतर स्पर्धांमध्ये द्वितीय व तृतीय क्रमांकही पटकावले. महाविद्यालयाला वैयक्तिक व सांघिक स्पर्धांसह संगीत, नृत्य आणि नाट्य विभागांचे फिरते चषक मिळाले. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशिक्षक आणि सांस्कृतिक विभागाचे अभिनंदन केले.

सिंधुदुर्ग समाचार

epaper : www.sindhudurgsamachar.com

कोल्हापूर

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

सिंधुदुर्ग समाचारचा अंक आपल्या मोबाईलवर पाहण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा.

● शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ ● पाने ६ ● वर्ष ३६ ● अंक २३९ ● कोल्हापूर,सिंधुदुर्ग,मुंबई,रत्नागिरी,सांगली,सातारा,बेळगाव,गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत ३ ●

जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज : डॉ. राजेंद्र सिंह

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शाश्वत विकासासाठी जलसंवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे हा विवेक आहे, तर पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणे ही विकृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करण्याबरोबरच शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि 'जलपुरुष' डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (२२ ऑक्टोबर) आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' हा व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

जलसंवर्धनासाठी विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक

डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिसरात जलसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याबरोबरच उपलब्ध संसाधनांचा विवेकी वापर करण्याचे उदाहरण विद्यापीठाने निर्माण केले आहे. मात्र, शाश्वत विकासाची प्रक्रिया एका दिवसात पूर्ण होत नाही. त्यासाठी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागतात. पाण्याचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील विवेक जागृत करण्याची गरज अधोरेखित करत ते म्हणाले, की नव्या पिढीला निसर्ग आणि संस्कृतीच्या जतनासाठी तयार केले पाहिजे. शेतकरी आणि नागरिकांना जलसाक्षर करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. पर्यावरणविषयक लोकचेतना जागृत करून जलसंवर्धनाचे कार्य समाजाच्या व्यापक सहभागातून पुढे नेले पाहिजे.

नद्यांना प्रदूषणापासून वाचवा; काँक्रीटीकरण टाळा

नद्यांच्या संवर्धनाविषयी बोलताना डॉ. सिंह यांनी नदीप्रणालीचे नैसर्गिक स्वरूप जपण्याचे आवाहन केले. नद्यांना प्रदूषणापासून वाचवणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट-काँक्रीटच्या भिंती उभारून आपण नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत, असे त्यांनी नमूद केले. पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अल निनोच्या संभाव्य संकटाविषयी सावध करताना ते म्हणाले की, या हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. वेळीच नियोजन केले नाही, तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते. स्थलांतरात वाढ होण्याबरोबरच अन्नधान्य उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकचेतना जागृत करून जलस्रोतांचे संरक्षण आणि नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी लोकांमध्ये मिसळून काम करा : प्रा. माणिकराव साळुंखे

अध्यक्षीय भाषणात प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे यांनी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढत असतानाच पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी लोकांमध्ये मिसळून काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, की बदलत्या हवामानाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. या बदलांचा फटका कोल्हापूरसारख्या सधन प्रदेशालाही बसण्याची शक्यता असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी आतापासूनच कृतीशील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

डॉ. राजेंद्र सिंह यांनी पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्यासाठी विद्यापीठाला दिलेले मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यानुसार विद्यापीठाने जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. पाण्याची साठवणूक आणि त्याच्या वापराचे योग्य नियोजन करून विद्यापीठाने कोट्यवधी लिटर पाण्याच्या व्यवस्थापनाचे उदाहरण निर्माण केले आहे, असे प्रा. साळुंखे यांनी सांगितले.

महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पाहिलेले आधुनिक भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीसोबतच निसर्गाशी सुसंवाद राखणारा विकास साधला पाहिजे. त्यासाठी समाजात पर्यावरणविषयक जाणीव निर्माण करून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर आणि डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र व गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. या व्याख्यानाला विद्यापीठातील विविध विभागांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिंधुदुर्ग समाचार

epaper : www.sindhudurgsamachar.com

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

कोल्हापूर

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

सिंधुदुर्ग समाचारचाअंक आपल्या मोबाईलवर पाहण्यासाठी खरील क्युआर कोड स्कॅन करा.

● शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ ● पाने ६ ● वर्ष ३६ ● अंक २३९ ● कोल्हापूर,सिंधुदुर्ग,मुंबई,रत्नागिरी,सांगली,सातारा,बेळगाव,गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: kipsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत ३ ●

सामाजिक वंचितता व समावेशानावर विद्यापीठात विचारमंथन

कोल्हापूर/प्रतिनिधी :

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'पहिली सामाजिक समावेशन गोलमेज परिषद' आज शिवाजी विद्यापीठात पार पडली. 'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि व्यवहार' हा या परिषदेचा मुख्य विषय होता. सामाजिक वंचिततेची ऐतिहासिक कारणे, तिचे बदलते स्वरूप, भारतीय समतावादी विचारपरंपरा आणि सामाजिक समावेशनाच्या धोरणात्मक व व्यावहारिक पैलूंवर या परिषदेत विचारमंथन करण्यात आले.

या परिषेदेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना डॉ. कामत म्हणाले, सामजिक समावेशनाचे सिद्धांत आणि धोरण हे वंचितता नष्ट करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून आता ती प्रत्यक्ष व्यवहारात उतरविणे आवश्यक बनले आहे. यावेळी श्री. सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एम. के. भानारकर यांनी याप्रसंगी स्वागत व प्रास्ताविक केले. श्री. अविनाश भाले यांनी आभार मानले. महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सत्यशोधक, समतावादी आणि परिवर्तनवादी विचारांचा समकालीन सामाजिक वास्तवाशी संवाद घडवून आणणे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश होता. भारतीय समाजातील जातीय विषमता, स्त्री-पुरुष असमानता, शैक्षणिक व आर्थिक विषमता आणि विविध वंचित समूहांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचा व्यापक दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

परिषदेच्या पहिल्या सत्रात 'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि ऐतिहासिक संदर्भ' या विषयावर चर्चा झाली. प्राचार्य डॉ. हरीश भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर, शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे आणि डॉ. शरद गायकवाड यांनी आपली मांडणी केली. सामाजिक वंचिततेची संकल्पना, तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि भारतीय समाजातील विषमतेची संरचनात्मक कारणे या अनुषंगाने विचारांची देवाणघेवाण झाली.

दुसऱ्या सत्रात 'फुले विचार आणि भारतीय समतावादी विचारपरंपरा' या विषयावर चर्चा झाली. या सत्रात डॉ. दशरथ पारेकर, प्रा. डॉ. भारती पाटील



आणि डॉ. अरुण शिंदे यांनी आपले विचार मांडले. महात्मा फुले यांच्या विचारांचे सामाजिक परिवर्तनातील योगदान, भारतीय समतावादी परंपरेचे महत्त्व आणि समकालीन समाजातील त्यांची उपयुक्तता या विषयांना चर्चेत महत्त्व देण्यात आले.

तिसऱ्या सत्रात 'धोरणे, व्यवहार आणि सामाजिक समावेशनाचे भवितव्य' या विषयावर विचारमंथन झाले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार, सामाजिक कार्यकर्ते कॉ. संपत देसाई आणि सामाजिक विचारवंत हमायु मुरसल यांनी विविध मुद्द्यांवर आपली मते मांडली. सामाजिक न्याय, सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी, वंचित घटकांचे प्रतिनिधित्व आणि सामाजिक समावेशन अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना यांसारख्या मुद्द्यांचा या सत्रात ऊहापोह करण्यात आला.

परिषदेच्या समारोपप्रसंगी सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एम. के. भानारकर यांनी सामूहिक निष्कर्ष व शिफारसींची मांडणी केली. सामाजिक वंचिततेचे आकलन केवळ सैद्धांतिक पातळीवर न ठेवता ते प्रत्यक्ष सामाजिक वास्तव, घटनात्मक मूल्ये आणि सार्वजनिक धोरणांशी जोडण्याची आवश्यकता या परिषदेच्या विषयातून अधोरेखित झाली. परिषदेच्या आयोजनामागील उद्दिष्टांनुसार विविध अभ्यासक, संशोधक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यात वैचारिक संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

महा न्यूज ॲन्ड व्ह्यूज



जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन आणि पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज : डॉ. राजेंद्र सिंह

शिवाजी विद्यापीठात जलसंवर्धन आणि अहिंसक विकासावर विशेष व्याख्यान; पर्यावरण संवर्धनासाठी लोकचळवळ उभारण्याचे आवाहन

कोल्हापूर (महान्यूज ॲंड व्ह्यूज) :

शाश्वत विकासासाठी जलसंवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे हा विवेक आहे, तर पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणे ही विकृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करण्याबरोबरच शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि 'जलपुरुष' डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (२२ ऑक्टोबर) आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास' हा व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

जलसंवर्धनासाठी विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक

डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिसरात जलसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याबरोबरच उपलब्ध संसाधनांचा विवेकी वापर करण्याचे उदाहरण विद्यापीठाने निर्माण केले आहे. मात्र, शाश्वत विकासाची प्रक्रिया एका दिवसात पूर्ण होत नाही. त्यासाठी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागतात. पाण्याचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील विवेक जागृत करण्याची गरज अधोरेखित करत ते म्हणाले, की नव्या पिढीला निसर्ग आणि संस्कृतीच्या जतनासाठी तयार केले पाहिजे. शेतकरी आणि नागरिकांना जलसाक्षर करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. पर्यावरणविषयक लोकचेतना जागृत करून जलसंवर्धनाचे कार्य समाजाच्या व्यापक सहभागातून पुढे नेले पाहिजे.

नद्यांना प्रदूषणापासून वाचवा; काँक्रीटीकरण टाळा

नद्यांच्या संवर्धनाविषयी बोलताना डॉ.



सिंह यांनी नदीप्रणालीचे नैसर्गिक स्वरूप जपण्याचे आवाहन केले. नद्यांना प्रदूषणापासून वाचवणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट-काँक्रीटच्या भिंती उभारून आपण नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत, असे त्यांनी नमूद केले. पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अल निनोच्या संभाव्य संकटाविषयी सावध करताना ते म्हणाले की, या हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. वेळीच नियोजन केले नाही, तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते. स्थलांतरात वाढ होण्याबरोबरच अन्नधान्य उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकचेतना जागृत करून जलस्रोतांचे संरक्षण आणि नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी लोकांमध्ये मिसळून काम करा : प्रा. माणिकराव साळुंखे

अध्यक्षीय भाषणात प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे यांनी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढत असतानाच पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी लोकांमध्ये मिसळून काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, की बदलत्या हवामानाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. या बदलांचा फटका कोल्हापूरसारख्या सधन प्रदेशालाही बसण्याची शक्यता असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी आतापासूनच कृतीशील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

डॉ. राजेंद्र सिंह यांनी पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्यासाठी विद्यापीठाला दिलेले मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यानुसार विद्यापीठाने जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. पाण्याची साठवणूक आणि त्याच्या वापराचे योग्य नियोजन करून विद्यापीठाने कोट्यवधी लिटर पाण्याच्या व्यवस्थापनाचे उदाहरण निर्माण केले आहे, असे प्रा. साळुंखे यांनी सांगितले.

महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पाहिलेले आधुनिक भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीसोबतच निसर्गाशी सुसंवाद राखणारा विकास साधला पाहिजे. त्यासाठी समाजात पर्यावरणविषयक जाणीव निर्माण करून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर आणि डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र व गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. या व्याख्यानाला विद्यापीठातील विविध विभागांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंचितांच्या सिनेमावर सखोल अभ्यास आवश्यक

अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांचे प्रतिपाद

जनप्रवास : कोल्हापूर

मराठी चित्रपटसृष्टीची सुरुवात कोल्हापूरसारख्या पुरोगामी शहरातून झाली. कोल्हापूर ही चित्रपटाची पंढरी आणि केंद्रबिंदू असलेले शहर आहे. या शहरातून वंचित घटकाचे सिनेमातील स्थान हा विषय घेऊन कार्यशाळा होत असल्याचे समाधान आहे. वंचितांच्या सिनेमावर सखोल अभ्यास होणे आवश्यक असल्याचे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष. मेघराज राजे भोसले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वंचित घटकांचे सिनेमातील स्थान या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

ते म्हणाले, वंचित घटकांचे सिनेमातील स्थान हा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय असून त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास होणे गरजेचे आहे. वंचित घटकांकडे दुर्लक्ष न करता त्यांना



चित्रपटांमध्ये योग्य स्थान दिले पाहिजे. सर्व घटकांना सिनेमात योग्य प्रतिनिधित्व मिळाले, तरच समाजाभिमुख चित्रपटांची निर्मिती होईल. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करून ते स्वतःमध्ये रुजवले पाहिजे. त्याचा भविष्यात निश्चितच फायदा होईल, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना भविष्यात आवश्यक कोणतीही मदत उपलब्ध करून देण्यासाठी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, कोल्हापुरात अत्याधुनिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासाठी आम्ही महामंडळातर्फे प्रयत्नशील आहोत. यासाठी शिवाजी विद्यापीठाने सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, समाजामध्ये सिनेमाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दृक्-श्राव्य माध्यमाची छाप मोठी असून सिनेमा हे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विवेकदृष्टी ठेवून काम केले पाहिजे. समाजातील सत्य मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, तर ते लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचते. विद्यार्थ्यांनी स्वतःचे नाव मोठे केले, तर त्यातून विद्यापीठासह कोल्हापूरचेही नाव उंचावेल, असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.

प्रास्ताविक मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रीती भिसे व अभिजीत घागरे यांनी दिली, सूत्रसंचालन सायली गणेशकर यांनी केले. आभार साक्षी वाघमोडे यांनी मानले. यावेळी डॉ. अरुण शिंदे, डॉ. विजय चोरमारे, अश्विनी धायगुडे-कोळेकर, डॉ. अनमोल कोठडिया, डॉ. रत्नाकर पंडित, रवी सूर्यवंशी, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.